WWJMRD 2020; 6(1): 74-75
www.wwjmrd.com
International Journal
Peer Reviewed Journal
Refereed Journal
Indexed Journal
Impact Factor MJIF: 4.25
E-ISSN: 2454-6615

विश्वास गोरखनाथ वळवी
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

Correspondence:
विश्वास गोरखनाथ वळवी
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

''पवित्रशास्त्र आणि त्याची लेखनी''

विश्वास गोरखनाथ वळवी

Abstract
Slogan:- "I am the book of God; oh man, read me."
What a wonderful revelation: "Though Moses was commissioned to write his story by fiery writing, it was led by God." God has chosen many Christian writers, but he leads them. Today there are many Christian writers. Christian literature brings the hammer down on the authority of the Holy Spirit and the Holy Scriptures. The authority of God must flow over every page, word, study, and literary plan of Christian literature. You will get spiritual knowledge.
The Holy Scriptures are the scriptures of God, and when I look at them, I hear a voice, 'I am the book of God; This man, read me.

Keywords: God, Scripture, Christian, Holy Spirit, Word, Words, Moses, Almighty, Scriptures, Psalms

प्रस्तावना:
ब्रीदवाक्य:- ''मी देवाचे पुस्तक आहे; हे मानवा,मला वाच.''
किती अद्‌भुत प्रकटीकरण **''जरी मोशेला त्याची कथा अग्निमय लेखनीने लिहिण्यास नियूक्त केले,तरी त्या लेखणीचे नेतृत्व देवाने केले होते.''** देवाने अनेक ख्रिस्ती साहित्यिकांची निवड केलेली आहे,पण त्यांचे नेतृत्व तो स्वतः करतो.आज अनेक असे ख्रिस्ती साहित्यिक आहे जे ख्रिस्ती साहित्य लेखनामध्ये अख्रिस्ती तत्वांचा भरणा भरत असतात.असे ख्रिस्ती साहित्यिक पवित्र आत्मा आणि पवित्र शास्त्राचा अधिकारावर गदा आणतात.ख्रिस्ती साहित्याच्या पृष्ठावर,शब्दांवर,अध्यानांवर आणि साहित्यलेखनाचा प्रत्येक योजनेवर देवाचा अधिकार प्रवाहीत असायला हवा.तरच ख्रिस्ती साहित्य आणि त्याचे त्याची विश्वासहर्ता टिकून राहील आणि ख्रिस्ती समाजाला ख्रिस्ताचे योग्य ते आत्मिक ज्ञान प्राप्त होईल.
सि.एच.स्पर्जन साहित्य आणी पवित्रशास्त्र यांची सांगड घालून छान स्पष्टीकरण करतात ते म्हणतात पवित्र-शास्त्र जीवंत देवाचे लीखाण आहे, त्यातील प्रत्येक वचन सर्वसामर्थ्याच्या बोटाने लिहिलेले आहे; प्रत्येक शब्द जो अक्षयी त्याच्या मुखातून आलेला आहे; प्रत्येक वाक्य पवित्र-आत्म्याच्या अधिकारवाणीने लिहिलेली आहेत. जरी मोशेला त्याची कथा अग्निमय लेखनीने लिहिण्यास नियूक्त केले, तरी त्या लेखणीचे नेतृत्व देवाने केले होते. जरी दाविदाने त्याच्या वीणेला स्पर्श केला, आणि त्याच्या बोटांनी सुंदर स्तोत्रांना छेडले, तरी देवाने त्याचा हात सोनेरी वीणेच्या जीवंत तारांवरून फिरवला. जरी शल्‌मोनाने गीतरत्ने गायली असतील, किंवा उच्च दर्जाच्या ज्ञानाची वचने दिली असतील, तरी देवाने त्याच्या ओठांना निर्देशीत केले आणि उपदेशाला वक्तृत्वपूर्ण केले.
जर मी घडघडाट करणाऱ्या नहूमचा पाठलाग केला, जेथे घोडे पाण्यातून धावत होते, किंवा हबक्कूक, ज्याने कूशानाचे डेरे विपत्तीने घेरलेले पाहिले; जर मी मलाखी वाचले, तेथे पृथ्वी भट्टीसारखी तप्त झाली आहे; जर मी योहानाच्या गुळगूळीत पृष्ठाकडे वळलो तर तिथे तो प्रितीविषयी सांगतो, किंवा खडबडीत, धगधगणारे पेत्राची अध्याय, जेथे तो अग्नीविषयी सांगतो - जो देवाच्या शत्रूंना गिळंकृत करेल; जर मी यहूदाच्या पुस्तकाकडे वळलो तर तो देवाच्या शत्रूंवर बहिष्कार टाकतांना पाहतो, सर्वत्र मी देवाला बोलतांना पाहतो; ती देवाची वाणी आहे, मनूष्याची नाही; ती वचने - देवाची वचने आहेत, ती अनंत, अदृश्य, सर्वसमर्थाची वचने आहेत, या भूतलाच्या यहोवाची आहेत. पवित्र-शास्त्र हे देवाचे पवित्र-शास्त्र आहे, आणि जेव्हा मी ते पाहतो तेव्हा मला त्यातून आवाज येतो, 'मी देवाचे पुस्तक आहे; हे मानवा, मला वाच.

संदर्भसूची:-

1. विश्वासनाऱ्यासाठी पवित्रशास्त्र टीकासंग्रह, विल्यम मकडोनाल्ड, जी.एस.बुक्स, प्रथमावृत्ती, २०१७
2. स्त्रोतसहिता अध्याय १-वचन-१-१०.जुना करार.पवित्रशास्त्र